## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ३२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०६/२०१८

**१) ट्रकच्या धडकेत एक जखमी व एकाचा मृत्यु :–**

दिनांक २४/०६/२०१८ चे ०४.०० ते ०४.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने, लापरवाहीने निष्काळजीपणे चालवुन समोरील ट्रक क्र. आर. जे. २१/जी. बी.०१८२ च्या चालकास एन. एच. ०६ रोड बेला सेंटपिटर शाळेसमोर येथे धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत होवुन व आरोपी स्वत: जखमी होवुन हा सामान्य रुग्नालय भंडारा येथे औषधोपचारा दरम्यान मरण पावला आहे अशा फिर्यादी सुखदयाल सहीराम वय ३५ वर्ष, रा. सयेरन जि. नागोर राजस्थान यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) जनावरे कोंडुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २४/०६/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील पिकअप गाडी मध्ये क्षमते पेक्षा अधिक जनावरे कोंडुन भंडाऱ्याकडून खात रोडकडे जातांनी गाडी थांबवली असता गाडीमध्ये लहान मोठया ६ गायी किंमती ४२,०००/–रु. च्या गाडीमध्ये जनावरे वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी स.पो. नि. स्थागुशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(१)(घ)(ड)प्रा.नि.वा.का सहकलम ९ प्रा. सं. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) सोन्या दागीणे व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक २३/०४/२०१८ चे १६.०० ते २४/०४/२०१८ चे ०६.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी घरापासुन ५०० मिटर अंतरावर असलेले विनोद बाबुराव भिवगडे वय ४२ वर्ष, रा. रुक्मीनी नगर भंडारा यांचे घराचे समोरील दाराचे ताले तोडुन आत प्रवेश करुन बेडरुममधील सामानाची फेकफाक करुन आलमारीत असलेले सोन्याचे ताईत ३ ग्रॅम ५,०००/–रु. सोन्याची अंगठी ०१ ग्रॅम २,०००/–रु, १ सोन्याचा लॉकेट ३ ग्रॅम ५,०००/–रु, व नगदी ५,२००/–रु. असा एकुण १७,२००/–रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी ढुनेश्वर नामदेव हजारे वय ४० वर्ष, रा. न्यु फ्रेन्डस कॉलोनी केसलवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) जनावरांची कत्तल करुन गौमांस माल बाळगतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २४/०६/२०१८ चे ०९.१६ वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे घरी गौवंश जातीच जनावराची कत्तल करुन त्याचे पासुन २५ किलो ४०० ग्रॅम, गौमांस किंमती २५००/–रु. चा माल बाळगतांनी मिळुन आल्याने फिर्यादी सरतर्फे फिर्यादी पोउपनि. चेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९ भादवी. सहकलम ५,५(क),९,९(अ)म. प्रा. सं. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे. आरोपी अटक आहे.

**५) अश्लिल व वाईट शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १४/०६/२०१८ ते २०/०६/२०१८ यातील कोणीतरी अज्ञात व्यक्तीने निनावी पत्र तयार करुन पत्रामध्ये फिर्यादी यांना अश्लिल व वाईट शब्दात शिवीगाळ केली असे विजय कुंडलिक भुरे स्विय सहायक यांनी दिलेल्या लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,५०४,५०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलचे नियत्रंण सुटुन स्लीप होवुन डोक्याला मार लागुन गंभिर दुखापत होवुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक २४/०६/२०१८ चे ०९.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालक संतोष आसाराम झोडे वय ४० वर्ष, रा. बोनकठ्ठा हा मोटार सायकलने नाकाडोंगरी वरुन बोनकट्टा येथे जात असता रामनगर पात्री येथे त्याचे ताब्यातील मोटार सायकल रोडने अतिशय वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलचे नियत्रंण सुटल्याने स्लीप होवुन १५ ते २० फुट घसरत जावुन त्यास डांबरी रोडचा मार डोक्याला लागल्याने गंभिर दुखापत होवुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी देवेन्द्र निलकंठ झोडे वय ३८ वर्ष, रा. बोनकठ्ठा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे, कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. झोटींग पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**७) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे एक जखमी :-**

दिनांक २४/०६/२०१८ चे २०.३५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी धनराज झिंगर खोब्रागडे वय ५४ वर्ष, रा. लाखनी याची जखमी साळी धुर्पता मेश्राम ही पायदळ एनएच- ६ रोड क्रॉस करीत असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल लापरवाहीने, हयगयीने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे साळीस केसलवाडा फाटा येथे धडक मारुन रोडवर पाडुन व स्वत: पडुन तिला व स्वत:ला जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**८) विहीरीचे पाण्यात वृध्दाचे प्रेत मिळुन आले. :-**

दिनांक २४/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक सुर्यभान शामराव खांबलकर वय ७१ वर्ष, रा. बेला हा दिनांक २२/०६/२०१८ ला गुम झाले असता पो. स्टे. ला हरविलेबाबत तक्रार पोस्टे दाखल होती सदर मृतकचे प्रेत आज रोजी घराजवळील विहीरीत मृताअवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी अशोक ईस्तारी भोयर वय ४९ वर्ष, रा. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिरडकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) गळफास लावुन युवकाचा मृत्यु :-**

दिनांक २४/०६/२०१८ चे ०८.०० ते १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व त्याची पत्नी मुलगी हे नागपुर ला गेले असता नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी घरी परत आले असता यातील फिर्यादीचा मुलगा मृतक प्रमोद भाऊराव निमजे वय २८ वर्ष, रा. काजी नगर भंडारा याने स्लॅबच्या हुकला साडीच्या लाल रंगाच्या लेसने गळफास लावुन मृत अवस्थेत दिसुन आल्याने फिर्यादी भाऊराव पांडुरंगजी निमजे वय ५७ वर्ष, रा. काजी नगर भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ईलमकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१०) नॉयलान दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु :–**

दिनांक २४/०६/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक सहादेव चेतराम गोंडाने वय ४० वर्ष, रा. तिलक वार्ड मोहाडी पाण्याच्या टॉकी जवळ हा स्वत:चे राहते घरी किचनमध्ये छताचे लाकडी आळयाला नॉयलानच्या दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी विजय मोहन पराते वय २६ वर्ष, रा. तिलक वार्ड मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चांदेवार पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २४/०६/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील स्वराज ट्रॅक्टर हा ह भिलेवाडा येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभी करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. सेलोकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**१२) अवैध हातभट्टी/देशी दारु अडड्यांवर धाडी . . :–**

दिनांक २४/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, साकोली, पालांदुर, पवनी व अडयाळ येथे अवैध हातभट्टी/ देशी दारु अडड्यावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १७ लिटर हातभट्टी दारु किंमती २३८०/–रु, ८५१ लिटर ५८० मिली लिटर देशी + १ स्कॉर्पीओ गाडी + १ मोटार सायकल किंमती ५,६६,०१२/–रु असा एकुण किंमती ५,६८,३९२/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २४/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०१, तीन सिटर वाहनाकरीता– ८, ईतर वाहनांवरती – ९६ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.